cmyk




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२४, रविवार, १९मे २०२३ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लोकांची लोकांसाठीची २०२४ ची निवडणूक

## लंके की विखे उत्तर सोपे !



**२०२४ ची नगर दक्षिण लोकसभेची लोकांसाठी, लोकांची निवडणूक ठरली. हा राजकीय चमत्कार केवळ जनतेने उत्सफुर्तपणे निवडणूक हातात घेतल्यानेच घडतो असेच मतदानोत्तर लक्षात येते. १९५७ च्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेसचे विद्यामन खासदार बोगावत यांना पराभूत करून र.के.खाडीलकर निवडून आले. त्याला संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभुमी होती.**



**नगर : प्रतिनिधी**

१९९१ ला बाळासाहेब विखे पराभूत झाले त्यावेळी स्व. राजीव गांधींच्या हत्येमुळे सहानुभूतीची लाट तयार झाली. २००९ ला या मतदारसंघात भाजपचे विशेष राजकीय बळ नसताना दिलीप गांधी खासदार झाले. तशीच अवस्था कोपरगांव मतदारसंघात भाजपाचे भिमराव बडदे यांची झाली आणि मतदारसंघात सर्व आमदार काँग्रेसचे असूनही शंकरराव काळे पराभूत झाले. यावेळीसुध्दा या राजकीय संदर्भाचे अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते.

अहमदनगर दक्षिण् नगर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत २५ उमेदवार रिंगणात असले तरी अटीतटीची लढत महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्यातच आहे. या निवडणूकीचा मतदानोत्तर अंदाज वर्तविणे कठीण असले तरी अशक्य मात्र हमखासच नाही. या मतदारसंघातील १९५२ पासूनच्या निवडणूक इतिहासाचे ठळक संदर्भ आणि विद्यमान म्हणजे वर्तमान निवडणूकीतील चुरशीचे प्रसंग याचे व्यवस्थित अकलन आणि त्रयस्थपणे विश्लेषण केले तर ४ जुनला जाहिर होणाऱ्या निकालाच नेमकेपणाने अंदाज येऊ शकतो. या निवडणूकीत झालेल्या मतदानाचा कल लक्षात घेता महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे ही निवडणूक तुलनात्मकदृष्टया जड तर महायुतीचे उमेदवार नीलेश लंके अनपेक्षीत आश्चर्याचे धक्के देणारी ठरू शकते. कारण लोकसभेच्या गेल्या १८ निवडणूकीत जो राजकीय चमत्कार घडला नव्हता तो यावेळी खुलेआम मतपेटीद्वारे प्रत्यक्षात येताना दिसतो. दोन विशिष्ट समाजाने एकगठठा मते महाविकास आघाडीला म्हणजे लंके यांच्या पारडयात बिनबोभाट टाकली. हे मतदान सुमारे अडीच लाख इतके असण्याचा अंदाज आहे, हे या निवडणूकीचे आगळे-वेगळे वैशिष्य अधोरेखित करावे लागेल. याचा अर्थ हे लिड तोडल्यानंतर लंके आणि विखेंची विजयासाठीची स्पर्धा सुरू होईल.

या मतदारसंघात सुमारे १३ लाख मतदान झाले पण अडीच लाखाचा गठ्ठा लंकेंकडे बिनबोभाट सरकला तो विखे यांना मॅनेज करावा लागेल. या ५ लाख मतानंतर लंके आणि विखे यांच्यात विजयासाठी ९ लाख मतांमध्ये चुरस होईल. विखे राजकारणात कच्चे नाहीत. त्यांनी लंकेंच्या दोन लाख गठ्ठा मतांना काटशह देण्यासाठी तेवढयाच मतांची सोय केली असणार. ती कोणत्या मार्गाने हा त्यांच्या राजकीय क्लुप्तीचा भाग झाला. त्यावर आम्ही तुर्तास भाष्य करणार नाही. विखेंची ही व्यवस्था जर यशस्वी ठरली नाही तर लंके विजयाकडे झुकू शकतात. दुपारनंतर जे वाढीव मतदान झाले ते विखेंच्या किमान पथ्यावर पडणारे ठरू शकते. त्यांच्या यंत्रणेने हे मतदान बाहेर काढलेले असू शकते. अर्थात हा जर-तर चा भाग झाला. या लोकसभा मतदारसंघात जे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी पारनेर, श्रीगोंदे आणि शेवगांव-पाथर्डीत महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांना लिड मिळणार असा राजकीय निरीक्षकांचा होरा आहे. तर नगर शहर, राहुरी आणि कर्जत जामखेडमध्ये चुरस आहे. हे तीनही मतदारसंघ राष्ट्रवादीच्या आमदारांचे आहेत. शहराचे आमदार संग्राम जगताप आता महायुतीमध्ये असले तरी हे मतदार त्यांच्या बरोबर महायुतीला पसंती देतील याची शास्वती नाही. विजयाचे पारडे झुकविण्याचे उत्तरदायित्व राष्ट्रवादीच्या आमदारांचे असल्याने डॉ. सुजय विखे यांना निवडणूक जड ठरू शकते. तर लंके यांच्यासाठी हे आश्चर्याचे धक्के ठरू शकतात.

> *आ. प्रा. राम शिंदे यांच्यामुळे कर्जत-जामखेड विखेंना जरूर सावरेल. पण पाथर्डी-शेवगांवचा राजकीय असंतोष कायम राहिल्याचे दिसते. राष्ट्रवादीकडील विधानसभा मतदारसंघ सुधारण्याच्या घाईमुळे भाजपाचे हक्काचे मतदारसंघ दुरावले. विशेष म्हणजे ही निवडणूक तशी मतदारांनी हातात घेतली होती. त्यांच्यावर पुढाऱ्यांचा परिणाम जाणवत नव्हता. अर्थात हे पहिल्यांदाच झाले असे नाही. १९५७ च्या लोकसभा निवडणूकीत याची प्रचिती आली होती.*

विशेष म्हणजे विखे हे निवडणूकीच्या सुरूवातीपासून बचावात्मक भुमिकेत वावरले. त्यांनी माफी मागून अप्रत्यक्षरित्या आपल्या चुका मान्य केल्या. त्याचा सुज्ञ मतदारांवर परिणाम झाला. तसेच पाथर्डीत मला नाही तर मोदींना, त्यांना नसेल तर मुंडे यांना पाहून मतदान करा. नाहीतर तुतारी वाजवा असे राग वैतागाने म्हटले असेल पण त्याचा वेगळा परिणाम झाला. माधव फॅक्टर बुचकळयात पडला. ग्रामीण भागात शेतकरी वर्ग खुलेआम नारा प्रगट करत होता. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा झाली. त्यांनी मतदारसंघ आणि विखे यांच्या कामाबाबत ब्र शब्द काढला नाही. उलट काँग्रेसच्या मुस्लिम धोरणांवर टीका केली. त्यामुळे लंकेंसाठी बोनस मते अधिक भक्कम होऊन कधी नव्हे तो मुस्लिम मतदार मोठया संख्येने मतदानाला बाहेर पडला. तर पारनेरमध्ये अजितदादा पवार यांनी जी टीका टिपन्नी केली त्यामुळे स्थानिक मतदार दुरावला. त्यात माजी आमदार विजय औटी यांच्या पाठींब्यामुळे नाराजीचे प्रमाण वाढले. परिणामी पारनेरमध्ये लंके यांना रोखण्याऐवजी ते अधिक आघाडीवर गेले. त्यास विखे यांची निवडणूक रणनीतीच कारणीभूत ठरली. तशीच अवस्था राहुरीत झालेली दिसते. राहुरी कारखान्याचा मुद्दाव्यवस्थित हाताळला गेला असता तर विखेंना तेथून मोठी आघाडी मिळणे शक्य होते. परंतू गेल्या पाच वर्षात त्यांनी दुर्लक्ष केले.

जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार शिवाजी कर्डीले यांनी प्रयत्न जरूर केले पण कारखान्याचा विषय जैसे थे राहिल्याने मतदार मोठया प्रमाणावर विरोधात गेले.



# धनंजय मुंडेही जातीवाद करतात

## मनोज जरांगे यांचा गंभीर आरोप ; ४ जूनपासून उपोषण, विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांन मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. धनंजय मुंडे जातीयवाद करत नाहीत, असे वाटले होते पण तसे नाही, धनंजय मुंडेही जातीयवाद करत असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. धनंजय मुंडे हे मराठ्यांविरोधात पोस्ट करायला लावतात. मात्र, मराठ्यांनी शांत रहावे. फक्त एक महिना सहन करा, असे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.

### ४ जून पासून आमरण उपोषणाला सुरुवात करणार

*मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आपण ४ जून पासून उपोषण करणार असल्याची माहिती देखील मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. यामध्ये मी मागे हटणार नाही. कोणीही आले तरी हा निर्णय बदलला जाणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मी माझे प्राण देण्यासाठी देखील तयार आहे. मात्र, आता मागे हटणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.*



### तर विधानसभा निवडणुकीत माझ्यासह मराठा समाज उतरणार

*आम्हाला राजकारणात यायचे नाही. मात्र, मराठा समाजाला सगेसोयरेची अंमलबजावणी लागू करा. आणि मराठा समाजाचा समावेश ओबीसी मध्ये करावा. हे केले नाही तर विधानसभा निवडणुकीमध्ये माझ्यासह सर्व मराठा समाज मैदानात उतरणार असल्याचे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले. या वेळेस तरी आम्ही कोणावरही टीका केलेली नाही. मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही थेट नाव घेऊन विरोध करणार आहे. ज्याचे नाव आम्ही घेऊ त्याला निवडणुकीत पाडल्याशिवाय मराठा समाज शांत बसणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.*

धनंजय मुंडे हे प्रामाणिक आहेत. ते उपकार विसरत नाही, असा आमचा समज होता. ते जातीवाद देखील करत नाहीत. गोपीनाथ मुंडे यांनी देखील कधी जातिवाद केला नव्हता. तसेच धनंजय मुंडे यांनी देखील जातिवाद केला नव्हता, असे आम्हाला वाटत होते. मात्र, आता गेल्या काही दिवसांपासून ते देखील जातिवाद करत असल्याचे दिसून येत आहे. ते मराठा समाजा विरोधात पोस्ट करायला लावतात, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केला आहे.

त्यांना जातीय तेढ निर्माण करायचे आहे. आता त्यांची वेळ निघून गेली आहे. त्यामुळे ते मुद्दाम तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, मराठा समाजातील तरुणांनी शांत राहावे, असे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. मात्र, एक महिना ते काय करतात, याकडे लक्ष द्या. तुमच्या अंगावर आले तर स्वसंरक्षण करायचे. मात्र, स्वतःहून काहीही करू नका, असे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. उमेदवार निवडून येण्यासाठी माझ्यासोबतच्या फोटोचा वापर करत आहेत. माझ्या सोबतच्या फोटोचे बॅनर लावले जात आहेत. यात माझी काय चूक? मी मराठा समाजासाठी काम करत आहे, ते माझ्या बाजूला येऊन उभे राहतात आणि फोटो काढतात. मात्र, एका दिवसाचा स्वार्थासाठी समाजाचे नुकसान का करता? असा प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी विचारला आहे. मी कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिला नसल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे. मी एकाही उमेदवाराला पाठिंबा दिलेला नसल्याचे

उर्वरीत पान ३ वर

## खा. संजय राऊतांविरोधात

# नगरात गुन्हा दाखल

## नीलेश लंके यांच्या प्रचार सभेत प्रक्षोभक वक्तव्य

**नगर : प्रतिनिधी**



शिवसेनेचे नेते संजय राऊत यांच्या विरोधात नगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात प्रक्षोभक वक्तव्य केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या नगर येथे पार पडलेल्या सभेत राउत यांचे भाषण झाले होते.

कोतवाली पोलीस ठाण्याचे अंमलदार अतुल काजळे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांची नगर शहरातील क्लोरा ब्रुस विद्यालयाच्या मैदानावर दि. ८ मे रोजी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस शरद पवार यांच्यासह शिवसेना नेते संजय राउत यांच्यासह इतर महाविकास आघाडीचे वक्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना संजय राऊत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म या महाराष्ट्रात झाला म्हणून महाराष्ट्राला इतिहास आहे. औरंगाजेबाचा जन्म गुजरातमध्ये झाला

उर्वरीत पान ३ वर

# दोन जुनपासून विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन

## मंदिर समितीचा निर्णय

**पंढरपूर :प्रतिनिधी**



येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पूर्णत्वास येत आहेत. त्यामुळे विठ्ठल आणि रूक्मिणीमातेचे पदस्पर्श दर्शन दिनांक २ जून पासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. सध्या रोज पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत देवाचे लांबून दर्शन सुरू आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर संवर्धन कामांबाबत तसेच आषाढी यात्रापुर्व नियोजनाबाबत मंदिर समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार रमेश येवले व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच मूर्ती संरक्षणास प्राधान्य देऊन कामास सुरुवात करण्यात आली. सदरचे काम करत असताना काही नव्याने कामे निदर्शनास आल्याने या कामांसाठी ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागला आहे. सदरचे काम पूर्णत्वास येत असून, संवर्धनाचे काम दर्जेदार व पुढील अनेक वर्ष टिकेल या दृष्टीने करण्यात आले आहे. याशिवाय, २ जून पासून भाविकांच्या शुभहस्ते पूजा देखील सुरू करण्यात येणार आहेत. तसेच आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. असे असले तरी भाविकांना आपल्या लाडक्या विठुरायाच्या पायावर डोके ठेऊन दर्शन घेता येणार आहे.







स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# तंत्र गांडूळ खत निर्मितीचे



**गांडूळ खत उपलब्ध सेंद्रिय खतांपैकी एक उत्कृष्ट खत मानले जाते. गांडूळ खत निर्मितीचे तंत्र सोपे असून, महिला सहजरीत्या हे तंत्रज्ञान आत्मसात करून शेतावर गांडूळ खताची निर्मिती करू शकतात.**

## खड्डा भरण्याची पद्धत

गांडूळ खत तयार करण्यासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. गांडुळांचे कडक उन्हापासून संरक्षण होण्यासाठी बिछान्यावर छप्पर घालावे. छप्पर सिमेंटच्या पत्र्याचे किंवा शेतीमध्ये उपलब्ध असलेल्या तुराट्या, ज्वारीचे ताटे, गवत, पाचट इत्यादी किंवा बांबू वापरून करता येईल. छप्पर दोन्ही बाजूंना उताराचे असावे. जेणेकरून पावसाचे पाणी सहज निघून जाईल व दोन्ही बाजूंनी ऊन येणार नाही यासाठी छपराची मधील उंची २.५ मी. व बाजूची उंची १.५ मी. असावी. रुंदी ५ मी. व लांबी ३ मी. किंवा आवश्यकतेनुसार आणि सेंद्रिय पदार्थांच्या उपलब्धतेप्रमाणे असावी. जमिनीवर सर्वात खाली तळाला १५ सें.मी. जाडीचा सेंद्रिय पदार्थांचा (उदा. गव्हाचे काड, उसाचे पाचट, सोयाबीन-तूर, पालापाचोळा व शेतातील इतर वाया जाणारे सेंद्रिय पदार्थ इ.) थर द्यावा. त्यावर अर्धवट कुजलेले शेणखत व माती ३:१ प्रमाणात मिसळून त्याचा १५ सेमी जाडीचा थर द्यावा. (या थरामुळे उष्णता थांबवण्याचे काम करील.) पाण्यामध्ये शेण कालवून त्याचा १० सें.मी. जाडीचा तिसरा थर द्यावा. शेणामुळे सेंद्रिय पदार्थ कुजण्याची प्रक्रिया सुरू होईल व ते गांडुळांस खाद्य म्हणून उपयोगात आणता येईल. शेवटी बिछाण्यावर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन घालावे. हे आच्छादन १५ सेमीपेक्षा जास्त जाडीचे नसावे. बिछाना पाण्याने ओला करावा.(आवश्यकतेप्रमाणे रोज किंवा दिवसाआड बिछान्यावर पाणी शिंपडावे.) बिछान्यातील उष्णता कमी झाल्यावर एक दोन आठवड्यांनी या सेंद्रिय पदार्थांचा थर बाजूला सारून कमीत कमी १००० प्रौढ गांडुळे सोडावीत. गांडूळ बिछान्यात सोडल्यावर परत सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन करावे व बिछान्यास नियमित पाणी द्यावे. गांडुळांच्या संख्येनुसार गांडूळ खत निर्मितीस दीड ते दोन महिने लागतात.

**गांडूळ खत तयार करण्याच्या पद्धती**
- ढीग/बिछाना पद्धत
- खड्डा पद्धत
- टाकी पद्धत
- खड्डा भरण्याची पद्धत



## गांडूळ खत तयार करताना घ्यावयाची काळजी

बिछान्यावर पाणी टाकताना जास्त पाणी साचणार नाही व ओलावा ४० ते ५० टक्के राहील याची काळजी घ्यावी. बिछान्यातील तापमान २० अंश ते ३० अंश सेल्सिअसदरम्यान ठेवावे व त्यावर सूर्यप्रकाश येणार नाही याची काळजी घ्यावी. गांडूळ खताच्या बेडजवळ वाळवी, बेडूक, साप, मुंग्या, गोम, उंदीर व कोंबड्या येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## गांडूळ खत काढण्याची पद्धत

खताचा रंग काळसर तपकिरी झाल्यावर खत तयार झाले असे समजावे. खत तयार झाल्यावर पाणी देणे बंद करावे. वरचा थर थोडा कोरडा झाला की बिछान्यातील पूर्ण गांडूळ खत गांडुळांसकट बाहेर काढावे व त्यांचा बाहेर उन्हात ताडपत्रीवर किंवा गोणपाटावर शंकाकृती ढीग करावा. म्हणजे उन्हामुळे गांडुळे तळाला जातील. ढिगाच्या वरचे गांडूळ खत काढून घ्यावे. ३-४ तासात सर्व गांडुळे परत खत तयार करण्यासाठी बिछान्यात/खड्ड्यात सोडावीत. अशाच पद्धतीने खड्डा, कुंडी किंवा टाकी पद्धतीने गांडूळ खत तयार करता येते.

# सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते

**पारंपरिक शेतीच्या तुलनेमध्ये नव्या संकरीत जाती जमिनीतून पोषक घटकांची उचल अधिक प्रमाणात करतात. परिणामी सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता प्रामुख्याने दिसून येत आहे. त्यावर मात करण्यासाठी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांच्या वापराचे शास्त्र समजून घेण्याची आवश्यकता वाढत आहे.**



आधुनिक शेतीमध्ये नवनवीन बियाणे, नवीन खते, द्रवरूप खतांचा ठिबक सिंचनातून वापर आता नियमित होत आहे. जमिनीतील पोषक घटकांचे प्रमाण कमी होऊन, त्याच्या कमतरता पिकांमध्ये आणि सजीवामध्ये दिसू लागल्या आहेत. मातीच्या परीक्षणानंतर संतुलित प्रमाणात रासायनिक खतांचा वापर होण्याची आवश्यकता आहे. त्यातून जमिनीतील शोषून घेतलेल्या अन्नद्रव्यांचा पुरवठा भरून निघतो. मात्र, अलीकडील काळामध्ये दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होत आहे. सूक्ष्म अन्नद्रव्यांतील एखादा घटकही कमी असल्यास त्याचे विपरीत परीणाम अन्य अन्नद्रव्यांच्या शोषणामध्ये होतात. एकूणच पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो. उदा. लोह हे पोषक द्रव्य चुनखडीयुक्त जमिनीमध्ये कमी प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसून येते. बोरॉनची कमतरता हलक्या, उथळ आणि वालुकामय जमिनीत तसेच तांबड्या-लाल जमिनीतदेखील दिसते. प्रत्येक सूक्ष्म अन्नद्रव्याची कार्यपद्धती आणि पिकांच्या वाढीमध्ये त्याचे नेमके कार्य याविषयी माहिती घेऊ.

## जस्त

सूक्ष्म अन्नद्रव्याच्या समूहातील सर्वात महत्त्वाचे अन्नद्रव्य म्हणजे जस्त. अलीकडे या अन्नद्रव्याची कमतरता दिसून येत आहे. चिकणमातीयुक्त भारी जमिनीमध्ये जस्ताची उपलब्धता अधिक असते, तर हलक्या, उथळ, वालुकामय जमिनीत जस्ताची उपलब्धता कमी असते. जस्त अन्नद्रव्याला चांगला प्रतिसाद देणारी पिके : मका, भात, ज्वारी, संत्रावर्गीय फळझाडे आणि कांदा आदी. या अन्नद्रव्याला कमी प्रतिसाद देणारी पिके : ओट, मुळा, विविध प्रकारचे गवत आणि चारा, कोबी आणि वाटाणा. विविध पिकांसाठी शिफारस : जस्त सल्फेट २० ते २५ किलो प्रति हेक्टर प्रमाणात द्यावे. जस्त सल्फेट, तर जस्त चिलेटेट खते उपलब्ध आहेत. जस्त हे जलयुक्त वर्गात मोडत असून, चिकन-मातीवर घट्ट बसण्याची क्षमता देखील खूपच आहे. म्हणून जस्तयुक्त खताची मात्रा केवळ पहिल्या पिकासच लागू न होता त्याचे शेष परिणाम २-३ वर्षापर्यंत पिकांवर थोड्याबहुत प्रमाणात होतात. झिंकटेड युरिया, झिंकटेड सुफला आणि झिंकटेड सुपर फॉस्फेटसारखी नवी खते बनविण्यास सुरवात झाली आहे.

- वनस्पतीतील जस्ताचे कार्य : जस्त हे अप्रत्यक्षरीत्या प्रकाश संश्लेषण, हरितद्रव्य संश्लेषण आणि प्रथिनांची निर्मिती घडून आणण्यात सहभागी असते. संप्रेरकाची निर्मिती पिकांमध्ये असलेल्या जस्ताच्या प्रमाणावर अवलंबून असते. वाढबिंदूची वाढ झपाट्याने होण्यास मदत करते.
- कमतरतेची लक्षणे : जस्ताच्या कमतरतेमुळे पिकांच्या हिरव्या कोवळ्या पानांमध्ये तपकिरी रंगाचे ठिपके पडतात. पेरांची वाढ बरोबर होत नाही. परिणामी पात्यांचा आकार बदलतो. शिरा स्पष्ट पिवळ्या पडतात. कांड्या-कांड्यातील अंतर कमी होऊन उंची कमी होते. फूल आणि फलधारणा कमी होते.

## मँगनीज (मंगल)

सर्वसाधारणपणे मँगनीजची कमतरता व्यापक प्रमाणावर दिसून येत नाही. साधारणतः वालुकामय, उथळ आणि हलक्या जमिनीमध्ये उपलब्ध मँगनीज कमी असतो, तर भारी काळ्या बेसाल्टपासून तयार झालेल्या जमिनीमध्ये एकूण आणि उपलब्ध मँगनीज मुबलक प्रमाणात आढळते. तांबड्या-लाल आम्लधर्मीय जमिनीचा सामू ५ पेक्षा कमी असेल तरी मँगनीजची अतिउपलब्धता पिकाच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते.

चांगला प्रतिसाद देणारी पिके : बार्ली, लिंबूवर्गीय फळझाडे, वाटाणा, बटाटा, सोयाबीन आणि गहू.

वापर : कमतरता असलेल्या जमिनीत सुमारे २५ किलो प्रति हेक्टरी मॅगनीज सल्फेट हे अन्नद्रव्य दावे. उभ्या पिकांमध्ये कमतरता दिसल्यास ०.५% तीव्रतेच्या मॅगनीज सल्फेटच्या द्रावणाची फवारणी देखील उपयुक्त ठरते. मँगनीज सल्फेट, मँगनीज चिलेट याद्वारे आपण मँगनीजचा पुरवठा करू शकतो.

वनस्पतीतील कार्य : पिकांच्या जैविक आणि जीव रासायनिक प्रक्रियांना मँगनीज द्रव्य उत्तेजित करण्याचे कार्य करते. काही विकारांमध्ये मँगनीज हा प्रथिनांचा एक घटक-सहयोगी म्हणून कार्य करतो. प्रकाश संश्लेषण क्रियेमध्ये मँगनीज कमतरतेमुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी होते. याशिवाय ऑडीनोसीन ट्राय फॉस्फेटसारख्या ऊर्जाशक्ती पुरविणाऱ्या पदार्थांच्या निर्माणकार्यात मँगनीज आवश्यक असते.

कमतरतेची लक्षणे : मँगनीजच्या कमतरतेमुळे पानावर तपकिरी रंगाचे ठिपके दिसतात. द्विदल धान्याच्या पानावर शिराच्या मधील भागात पिवळ्या रंगाचे पट्टे दिसतात. साधारणतः मँगनीजची कमतरता प्रथम कोवळ्या पानावर दिसते. लिबूवर्गीय फळझाडांच्या पानावर तेलकट डाग दिसतात. ज्वारी व बाजरीवर बुरशी येते.



## लोह

भारतीय जमिनीमध्ये एकूण लोहद्रव्याचे प्रमाण २०,००० ते १,००,००० मिलिग्रॅम प्रति किलो माती इतके आहे. मात्र, उपलब्ध लोहाचे प्रमाण अतिशय कमी आहे. उपलब्ध लोहाचे प्रमाण हे जमिनीच्या मूलभूत गुणधर्मांवर अवलंबून असते. फेरोमॅग्नेशिअम खनिजे म्हणजे लोहाचे मूलस्त्रोत होय. चिकणमातीयुक्त जमिनीत ही खनिजे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. परिणामी एकूण लोहसाठा अधिक दिसून येतो. मात्र, हे लोह पिकांना उपलब्ध स्वरूपामध्ये नसते. लोहाची गरज चुनखडीयुक्त जमिनी भागवू शकत नाहीत. म्हणून पिकांसाठी लोहयुक्त खतांचा वापर करावा लागतो.

- लोहयुक्त खते : फेरस सल्फेट, अमोनियम सल्फेट, लोह चिलेट, अमोनिया पॉली सल्फेट. लोहयुक्त खतांना चांगला प्रतिसाद देणारी पिके : संत्रावर्गीय फळझाडे, द्राक्षे, फुलझाडे आणि अन्य फळझाडे. लोहयुक्त खते चुनखडीयुक्त जमिनीत वापरल्यास पिकांना लागू होत नाहीत. अशा परिस्थितीत लोहयुक्त खते पिकांना फावारणीतून द्यावीत. जमिनीतून २५ ते ५० किलो प्रति हेक्टर लोह सल्फेटच्या रूपाने देता येते. फळझाडे आणि पिकांना ०.५ ते १.० टक्के तीव्रतेच्या द्रावणाची फवारणी संवेदनशील अवस्था लक्षात घेऊन २-३ वेळा करावी. ही फवारणी जमिनीतून दिलेल्या मात्रेपेक्षा सरस ठरते.
- वनस्पतीतील कार्य : पिकांच्या हिरव्या पानांचा लोह हा घटक नसला तरी अप्रत्यक्षरीत्या प्रकाश संश्लेषण क्रियेत उत्तेजकाचे कार्य करतो. त्यामुळे हरितद्रव्य तयार होण्यास मदत होते. लोह अनेक विकरांचा (एन्झायम्स) घटक असून, इलेक्ट्रॉन स्थलांतर क्रियेत आणि इतर जीव-रासायानिक क्रियेत भाग घेतो. नत्र स्थिरीकरण प्रक्रियेत लोह मदत करतो. लोहद्रव्याच्या कमतरतेमुळे पिष्टमय पदार्थाचे प्रमाण घटते. पिकांमध्ये स्फुरदाचे शोषण अधिक झाले तर लोहाच्या शोषणावर प्रतिकूल परिणाम होतो. लोहाचे चलनवलन अगदीच कमी असल्यामुळे मुळ्यामधून वरच्या अवयवापर्यंत द्रव पोचण्यासाठी उशीर लागतो. म्हणून लोह द्रव्याच्या कमतरतेची लक्षणे नवीन कोवळी पाने, उमललेल्या कळ्या यावर लवकर दिसतात.
- कमतरतेची लक्षणे : पिकांची कोवळी पाने पिवळी पडतात. पानातील नसांच्या आतील भाग पिवळा होतो. अधिक कमतरता असल्यास पाने पांढरी आणि जर्जर होतात. पाने, कळ्या व वाढबिंदू गळून पडतात. फुले कमी लागतात. वांझ निर्मिती होते.

# शास्त्रीय पद्धतीने फळबाग लागवड

**फळबाग लागवडीसाठी उत्तम निचऱ्याची ६.५ ते ७.५ च्या दरम्यान सामू असणारी जमीन निवडावी. जमिनीच्या खोलीनुसार फळपिकांची निवड करावी. ३० ते ४५ सें.मी. खोली असणाऱ्या जमिनीत बोर, सीताफळ, काजू या पिकांची लागवड करावी. ७.५ सें.मी.पेक्षा कमी खोलीच्या जमिनीत कोणतीही फळझाडे लावू नयेत. ४५ ते ९० सें.मी. मध्यम खोल जमिनीत पेरू, डाळिंब, अंजीर, पपई ही फळझाडे लावावीत. आंबा, चिकू, चिंच, जांभूळ, लिंबूवर्गीय फळझाडांना एक मीटरपेक्षा जास्त खोलीच्या जमिनी लागतात. जमीन शक्यतो सपाट असावी. उतार २ किंवा ३ टक्क्यांपेक्षा अधिक नसावा. ज्या जमिनीचा उतार १५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, त्या ठिकाणी टप्पे करून ठिबक सिंचन पद्धत वापरून लागवड करावी.**



फळझाडांची लागवड करताना योग्य लागवड पद्धत निवडावी. कारण याच गोष्टीवर फळझाडांचे उत्पादन, रोग आणि किडींचा प्रादुर्भाव अवलंबून असतो. दोन झाडांतील अंतर शिफारशीनुसार जर ठेवले नाही, तर फळबागेतील आर्द्रता वाढते. हवा खेळती राहत नाही, रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढतो.

## लागवडीच्या पद्धती

- चौरस मांडणी पद्धत : बागेची जमीन चौरसामध्ये विभागून चौरसाच्या चारही कोपऱ्यांवर फळझाडे लावतात, त्यामुळे दोन ओळींतील आणि झाडांतील अंतर समान राहते. फळझाडांच्या दोन ओळी परस्परांना काटकोनात छेदतात. बागेची उभी- आडवी मशागत करणे सोपे जाते. दोन्ही दिशांना झाडांना पाणी देता येते. या पद्धतीनुसार आंबा, पेरू, चिकू या फळपिकांची लागवड करणे सोपे जाते.
- आयत मांडणी पद्धत : या पद्धतीमध्ये चौरस पद्धतीपेक्षा थोडा बदल केलेला आहे. कारण दोन झाडांतील अंतरापेक्षा दोन ओळींतील अंतर काही फळझाडांच्या बाबतीत जास्त ठेवावे लागते. उदा. फळझाडांच्या दोन ओळींमध्ये ६ ते ८ फूट अंतर, तर ओळींतील दोन फळझाडांमध्ये ३ ते ४ फूट अंतर असते. डाळिंब व द्राक्षाची लागवड कमी अंतर ठेवून आयताकृती पद्धतीने करावी लागते. या पद्धतीत चौरस पद्धतीचे सर्व फायदे मिळतात. मात्र, बागेमध्ये मशागत करणे जरा अवघड जाते.
- समभुज त्रिकोणी मांडणी पद्धत : समभुज त्रिकोणी मांडणी पद्धत ही चौरस पद्धतीप्रमाणे असते. परंतु पाचवे झाड हे चौरसाच्या मध्यभागी लावतात. त्या झाडाचे आयुष्य कमी कालावधीचे असते. चौरसातील झाडे मोठी झाल्यानंतर हे पाचवे झाड काढून टाकतात. आंबा, चिकू, लिची अशा सावकाश वाढणाऱ्या झाडांमध्ये हे वेगळ्या प्रकारचे पाचवे झाड लावतात. या पद्धतीत झाडांची संख्या जवळजवळ दुप्पट वाढते, त्यामुळे झाडांची गर्दी वाढते आणि बागेच्या मशागतीला अडथळा येतो. म्हणून काही वर्षांनी मधले झाड काढून टाकावे लागते.
- षटकोन पद्धत : षटकोन पद्धतीमध्ये समभुज त्रिकोणाच्या कोपऱ्यावर झाडे लावतात. त्यामुळे षटकोनाच्या सहा कोपऱ्यांवर सहा झाडे आणि मध्यभागी एक झाड बसते. या पद्धतीत सर्व झाडांमध्ये समान अंतर असते. मशागत कर्णरेषेवर उभी- आडवी करता येते. या पद्धतीत सुमारे १५ टक्के अधिक झाडे बसतात. चौरस पद्धतीमध्ये झाडांची दाटी वाढून मशागतीचे काम अवघड जाते.
- समपातळी रेषा मांडणी पद्धत : डोंगराळ भागामध्ये ज्या ठिकाणी जमीन सपाट नसते, अशा ठिकाणी फळबाग लागवड करण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. जमिनीचा उतार जास्त असला, की मशागत करणे आणि पाणी देणे अवघड असते. मातीची धूप होते. अशा परिस्थितीत फळझाडांची लागवड सरळ रेषेत न करता समतल रेषेवर करावी. बागेत समतल रेषेप्रमाणे मशागत करावी लागते. पाण्याचे पाट किंवा ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा. झाडांतील अंतर समान नसते. दर एकरी झाडांची संख्या इतर पद्धतीपेक्षा कमी असते.

## लागवडीचे नियोजन

- खड्डे कमीत कमी २० दिवस उन्हात तापू द्यावेत. खड्डे खणताना आंबा, चिकू, पेरू व नारळ यासारख्या झाडांसाठी ९० x ९० सेंमी आकाराचे लांब, रुंद व खोल खड्डे खणावेत. कागदी लिंबू, डाळिंब, आवळा, सीताफळ यांसारख्या फळझाडांना ७५ x ७५ सेंमी किंवा ६० x ६० सेंमी आकाराचे लांब, रुंद व खोल खड्डे खणावेत व नंतर जैविक खते व सेंद्रिय खते या खड्ड्यांमधील माती मिसळून लागवड करावी.
- सघन लागवड पद्धत आंबा व पेरू लागवडीसाठी वापरली जाते. आंबा कलमांची १० x १० मीटर अंतरावर, तर पेरूची ६ x ६ मीटर अंतरावर लागवड करतात. सघन लागवड करताना दोन्ही पिकांमध्ये ३ x २ मीटर अंतर ठेवून लागवड करतात. या लागवड पद्धतीमध्ये एकरी झाडांची संख्या वाढते; पण या पद्धतीमुळे झाडांची छाटणी व वळण देणे हे दोन्ही मुद्दे जर शास्त्रोक्त पद्धतीनुसार व्यवस्थित झाले, तरच झाडांची फळधारणा लवकर आणि भरपूर होते.




## शॉर्ट न्यूज

### बिबट्याचा मेंढपाळावर जीवघेणा हल्ला

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील भेर्डापूर येथे मेंढळपाळावर गिन्नी गवतातून बिबट्याने हल्ला केला. यात या मेंढपाळाला पाच ते सहा ठिकाणी जखमा झाल्या आहेत. दत्तात्रय सखाराम राऊत (रा. भेर्डापूर) हा मेंढपाळ भेर्डापूर गावात मेंढ्या चरत असतांना अचानकपणे बिबट्याने मेंढीला पकडले. हे लक्षात येताच राऊत याने आरडाओरड केल्याने आसपास असणारे चार-पाच मेंढपाळ तिकडे धावले. मेंढपाळ आल्याचे पाहताच बिबट्याने मेंढीला सोडून राऊत यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात राऊत यांच्या पाठीवर, दोन्हा दंडावर जखमा झाल्या आहेत.

### अनुष्का उंडे ९९ टक्के गुण मिळवून प्रथम

■ **कोपरगाव :** सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एक्झामिनॅशनने १० वीच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले. यात संजीवनी अॅकॅडमीच्या अनुष्का सचिन उंडे हिने ९९ टक्के गुण मिळवून कोपरगाव तालुक्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकाविला. तसेच तिने संस्कृत व समाजशास्त्र या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवून आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडविले. या परीक्षेत ३० विद्यार्थ्यांनी ९० टक्यांपेक्षा अधिक तर ६० विद्यार्थ्यांनी ८० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळवून एक विक्रम प्रस्थापित केल्याची माहिती संजीवनी अॅकॅडम ीने दिली.

### ‘यशोधन’च्या मदतीने माळी कुटुंबिय भारावले!

■ **संगमनेर :** तालुक्यातील तालुक्यातील काकडवाडी येथे झालेला अवकाळी पाऊस व वादाळाने माळी वस्ती येथील रहिवासी दत्तू वेणनाथ माळी यांच्या घरावरील पुर्ण छत उडून गेले व घरातील जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले. सदर कुटुंबियांना आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन कार्यालयामार्फत किराणा साहित्य प्रदान करीत मदतीचा हात देण्यात आला. या मदतीने माळी कुटुंब अक्षरशः भारावून गेले. यावेळी आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, नितीन आल्हाट सहित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### संचालक मंडळावर गुन्हा दाखल

■ **नगर :** जिल्ह्यातील अनेक पतसंस्थेतील विविध गैरकारभार, घोटाळे उघडकीस आले आहेत. आता अहमदनगर जिल्ह्यातील आणखी एका मल्टीस्टेट पतसंस्थेकडून कोट्यावधींची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. नगर शहरासह जिल्हाभरात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शाखा सुरु केलेल्या ध्येय मल्टीस्टेट पतसंस्थेच्या संचालक मंडळाने जिल्हा भरातील अनेक ठेवीदारांकडून ज्यादा परतावा देण्याचे आमिष दाखवून गोळा केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या ठेवी अडकवून ठेवत त्या परत न देता सर्व शाखा बंद करून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केली असल्याचे समोर आले आहे.

### पाथर्डीत दूषित पाणीपुरवठा

■ **पाथर्डी :** नगरपरिषदेकडून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील बोरुडे व लबडे वस्ती परिसरात मैला मिश्रित, दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. या भागात नगरपरिषेकडून पाणी सोडण्यात आले. मात्र, सोडलेले पाणी नळामधून मैला मिश्रित पाणी येऊन पाण्यावर फेस तयार झाला होता. पाथर्डी शहरातील अनेक भागांमध्ये अशा पद्धतीने लोकांना दूषित पाणी मिळुत आहे. नगरपरिषदेच्या प्रशासनाला याबाबत नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही त्यावर कोणतेही कारवाई होत नाही.

# चारधाम यात्रेदरम्यान रील बनवण्यावर बंदी

## सरकारकडून नवा आदेश जारी





**उत्तराखंड : वृत्तसंस्था**

भाविक प्रतीक्षा करत असलेल्या चारधाम च्या यात्रेला १० मे २०२४ पासून सुरु झाली आहे. त्यात केदारनाथ आणि गंगोत्री, यमुनोत्रीसह चारधामचे दर्शन करण्यासाठी देशभरातून भाविक मोठ्या प्रमाणात येत आहेत. दरम्यान उत्तराखंड सरकारने इथे येणाऱ्या भाविकांसाठी एक नवीन आदेश जारी केला आहे, ज्या आदेशात चारधाम यात्रेला आलेल्या प्रत्येक यात्रेकरुंना मंदिराच्या ५० मीटरच्या परिसरात व्हिडिओ आणि रील बनविण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे.

सध्या सोशल मीडियावर रील बनवणे ही सवय प्रत्येक व्यक्तीला लागलेली आहे. त्यातला एक विषय म्हणजे, अनेक व्यक्ती फक्त रिल बनवण्यासाठी चारधामची यात्रा करतात असे दिसून आले. त्यामुळे मंदिराच्या परिसरात अनावश्यक गर्दी होताना दिसून येते. तर दुसऱ्या बाजूला भक्तीभावाने दर्शनाला आलेल्या भाविकांना या गोष्टींचा नाहक सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कडक भूमिका घेतली आहे.

नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार, चारधाम यात्रेदरम्यान मंदिरांच्या साधारण ५० म ीटरच्या परिसरात मोबाईल वापरण्यासाठी एसओपी जारी केली असून ५० मीटर मंदिर परिसरात संपूर्ण रील आणि व्हिडिओ बनविण्यास बंदी घालण्यात आली आहे. मात्र या सर्वांवर पोलीस प्रशासन एकदम बारकाईने लक्ष ठेवणार आहे.

उत्तराखंड राज्याचे मुख्य सचिव असलेले राधा रतुरी यांनी हा आदेश जाही केलाय. शिवाय चारधाम यात्रेसंबंधीत कोणतीही चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्या व्यक्तींवर प्रशासन गुन्हा दाखल करणार असल्याचे ही, राधा रतुरी म्हणाले. या सर्वांवर उत्तराखंडच्या मुख्य सचिवांनी त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.उत्तराखंडच्या मुख्य सचिव राधा रतुरी यांनी सांगितले की, शुक्रवार ३१ मे पर्यंत चारधाममध्ये व्हीआयपी दर्शन बंद असून हरिव्दार आणि ऋषिकेशमध्ये ऑफलाईन नोंदणी रविवार १९ मे पर्यंत बंद राहील. मंदिर परिसराच्या ५० म ीटरपर्यंत व्हिडिओग्राफी आणि रील मोठ्या प्रमाणात तयार केले जातात आणि एकाच ठिकाणी असंख्य लोक जमतात,त्यामुळे अनेक भाविकांची गैरसोय होते.

# वैशाख पौर्णिमेला होणार वन्य प्राण्यांची गणना

## वनविभागाकडून माहिती



**नगर : प्रतिनिधी**

वन विभागातर्फे दरवर्षी वैशाख पौर्णिमेला वन्य प्राण्यांची गणना केली जाते. या गणनेसाठी वनविभाग सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील अभयारण्यासह वनविभागाच्या ठिकाणी ही प्राणी गणना केली जाणार आहे.

जिल्ह्यातील प्रमुख पाणवठ्याच्या ठिकाणी वन विभागातर्फे उंच ठिकाणी झाडांच्या बांध्यावर किंवा टेकडीवर झाडांच्या फांद्यांच्या साहाय्याने अडोसा निर्माण केला जातो. त्यामध्ये वन विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच काही पर्यावरण मित्र स्वयंसेवक म्हणून थांबतात. वैशाख पोर्णिमेला दिवसा आणि रात्री किती वन्य प्राणी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्याची गणना केली जाते. वन्य प्राण्यांच्या वेगवेगळ्या वर्गवारीतील किती प्राणी आले. त्यांची गणना केली जाते, अशी माहिती वनविभागाकडून देण्यात आली.



# राहुरी फॅक्टरीत वैष्णवी चौकात रविवारी जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धा

## विजेत्यांना मिळणार भरघोस बक्षिसे स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**राहुरी : प्रतिनिधी**

राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्यावतीने रविवार १९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील उदयोन्मुख कलाकारांना आपले कलागुण सादर करण्यासाठी वाव मिळावा या हेतूने वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्यावतीने ही नृत्य स्पर्धा आयोजित केली आहे.

या स्पर्धेसाठी सामूहिक नृत्य गटास प्रथम पारितोषिक ११००१ रु. मुंबई उच्च न्यायालयाचे विधिज्ञ शशिकांत संसारे, द्वितीय पारितोषिक ७००१ रुपये मुंबई येथील पोलीस निरीक्षक मनोज शिंदे, सामूहिक नृत्य लहान गट प्रथम पारितोषिक ७००१ रुपये सत्यजित कदम फाउंडेशचे अजित चव्हाण व भारत शेटे यांच्याकडून द्वितीय पारितोषिक ५००१ रुपये अनिल डोळस यांच्याकडून दिली जाणार आहेत. सोलो नृत्य मोठा गट प्रथम पारितोषिक ७००१ रुपये साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, द्वितीय पारितोषिक इलेक्ट्रिकलचे अमोल तुरकणे, प्रशांत डुक्रे,संदीप निभे तर तृतीय पारितोषिक ४००१ ऋषिकेश इंटरपायजेस चे निखिल कुऱ्हाडे यांच्याकडून सौजन्य केली जाणार आहे.

सोलो नृत्य लहान गटास प्रथम पारितोषिक ५००१ हारून पठाण, द्वितीय पारितोषिक ४००१ रुपये स्वराज्य उद्योग समूहाचे अध्यक्ष किशोर गडाख, तृतीय पारितोषिक ३००१ रुपये कदम पेंट्स चे प्रसाद व सचिन कदम तर चतूर्थ २५०१ रुपये साई अर्णव सॉमिलचे जालिंडर दोंड यांच्याकडून दिली जाणार आहे. विशेष पारितोषिक सौजन्य आंबिका स्टोन क्रेशरचे मयुर भोसले व साई स्टोन क्रेशरचे अजय गोसावी व आदिनाथ कडू यांनी केले आहे.

ेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी ७७०९०३७७५०, ९६६५९१९९३३ या भ्रमणध्वनी क्रम ांकावर संपर्क साधावा असे आवाहन वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून...

### धनंजय मुंडेही जातीवाद करतात

देखील मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. खोटा पाठिंबा आणि खोटे फोटो लावून काही उपयोग होणार नाही. तुम्हाला जर मतदान हवे असेल तर समाजाकडे मागा, असे आवाहन देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.

### खा. संजय राऊतांविरोधात नगरात गुन्हा दाखल

आहे. ती जी माती आहे ती औरंगाजेबची माती आहे. त्या मातीतील हे दोन व्यापारी आहेत. औरंगाजेबचा जन्म नरेंद्र मोदी यांच्या गावात झाला आहे. इतिहास पहा तुम्हीदावात नावाचं गाव अहमदाबादच्या बाजूला आहे. औरंगाजेब तेथे जन्माला आला आहे. त्यामुळे ते आपल्याशी औरंगाजेबी वृत्तीने वागत आहेत. २७ वर्षे औरंगाजेब महाराष्ट्र जिंकण्यासाठी लढत होता. शेवटी त्या औरंगाजेबाला या महाराष्ट्रात गाडून त्याची कबर खणलेली आहे. तेंव्हा नरेंद्र मोदी तु कौण है असे वक्तव्य राऊत यांनी नगरच्या सभेत केले होते. त्यांच्या या वक्तव्याच्या दहा दिवसानंतर नगर पोलीसांनी राऊतांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, राऊत यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयासंदर्भात काँग्रेसचे नगर शहराध्यक्ष किरण काळे यांनी टीका केली आहे. केंद्र सरकारच्या आखत्यारीत असलेल्या देशातील ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स या यंत्रणांचा गेल्या दहा वर्षात अत्यंत चुकीच्या पध्दतीने वापर सुरू आहे. पोलीस प्रशासन हा राज्य सरकारचा विषय असून या यंत्रणेचाही सरकारकडून गैरवापर सुरू आहे. एखाद्या वक्तव्याची सोईस्करपणे चिरफाड करून राजकीय आकासातून गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारा महाराष्ब्र आहे. दिल्लीपुढे महाराष्ट्राला झुकविण्याचे आजवर अनेक प्रयत्न झाले. परंतू महाराष्ट्राच्या स्वाभीमानी नेत्यांनी ते मनसुबे हाणून पाडले. संजय रातउ यांच्यावर यापूर्वीही सत्तेचा गैरवापर करून खोटया-नाटया कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यांना तुरूंगात डांबण्यात आले. मात्र ते लढवयये आहेत. ते थांबले नाहीत आणि थांबणारे नाहीत असा विश्वास काळे यांनी व्यक्त केला.









# निळोबारायांच्या पालखीसाठी रांध्याची बैलजोडी !

## संतोष काटे यांनी खरेदी केली नवी बैलजोडी

**रांधे : प्रतिनिधी**

संत परंपरेली शेवटचे संत संत निळोबाराय यांच्या आषाढ महिन्यात पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या पालखी सोहळयासाठी रांधे येथील युवा शेतकरी संतोष काटे यांची बैलजोडी जुंपण्यात येणार आहे. काटे यांना हा मान मिळाल्यानंतर त्यांनी पालखी सोहळयासाठी नवी बैलजोडी खरेदी केली आहे.

छाकटी पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या श्री क्षेत्र पिंपळनेर येथून २ जुलै रोजी संत निळोबाराय महाराजांच्या पालखी सोहळयाचे पंढरपुरकडे प्रस्थान होणार आहे. दरवर्षीच्या आषाढी वारीतील पालखी सोहळयासाठी आपल्या बैल जोडीला मान मिळावा यासाठी रांध्याचे मा. सरपंच तथा विद्यामान सदस्य संतोष काटे हे गेल्या अनेक वर्षापासून आग्रही होते. त्यांचे हे स्वप्न यंदा पुर्ण झाले असून निळोबाय संस्थानचे अध्यक्ष अशोक सावंत यांनी काटे यांच्या बैलजोडीस बहुमान देण्याची घोषणा केल्यानंतर काटे यांनी भारदस्त बैलजोडीचा शोध सुरू केला.

मा. आ. नीलेश लंके यांनी नगर येथे आयोजित केलेल्या शिवपुत्र संभाजी या महानाटयामध्ये असलेली बैलजोडी खरेदी करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात त्यांना यश आले नाही. सोलापूर येथील शेतक-याने कर्जत येथील बाजारात विक्रीसाठी आणलेली भारदस्त बैलजोडी काटे यांना भावली. त्यांनी ती खरेदी करण्याचा निर्णय घेतला. चांगदेव थोरात, रामदास शेटे, संपत कड, शकीर तांबोळी, कैरूभाउ म्हस्कुले, उत्तम पावडे, संतोष कायगुडे यांनी ही बैलजोडी खरेदीचे नियोजन केले.


संत निळोबाराय पालखी सोहळयासाठी रांधे येथील संतोष काटे यांच्या बैलजोडीला मान मिळाला आहे.

### ग्रामस्थांकडून बैलजोडीचे पुजन

- *कर्जत येथून बैलजोडी आणण्यात आल्यानंतर रांधे ग्रामस्थांनी बैलजोडीचे मोठया उत्साहात स्वागत केले.*
- *संत निळोबारायांच्या पालखी सोहळयासाठी गावातील बैलजोडीस संधी मिळाल्याने गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.*

# तरूणाच्या मृतदेहाचे तुकडे पाटामध्ये सापडले

## नेवासे तालुक्यातील घटना

**नेवासे : प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील बालाजी देडगांव येथे पाटामध्ये तरूणाच्या शरीरराचे तुकडे आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. तरूणाच्या शरीराचे तुकडे करून पाटातील पाण्यात फेकून दिले होते.




अनोळखी असलेल्या तरूणाच्या शरीराचे तुकडे गोणीमध्ये भरून ही गोणी पाटाच्या पाण्यामध्ये फेकून देण्यात आली होती. बालाजी देडगांव येथील गावालगत असलेल्या पाटामध्ये २५ ते ३० वर्षे वय असलेल्या अनोळखी असेल्या तरूणाच्या शरीराचे अवयव कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेमुळे देडगांव परीसरात भितीचे वातारवरण पसरले आहे.

पाटामध्ये गोणीमध्ये तरूणाच्या शरीराचे तुकडे आढळून आल्याने परीसरातील नागरीकांना घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. देडगांवचे पोलीस पाटील प्रल्हाद ससाणे यांनी नेवासे पोलीस ठाण्यास याबाबत खबर दिल्यानंतर नेवासे पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या कुकाणे पोलीस दुरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक प्रमोद वाघ, पोलीस नाईक किरण पवार यांच्यासह पोलीस फाटा घटनास्थळी दाखल झाला. पंचनामा करण्यात येउन पुढील सोपसकारही पुर्ण करण्यात आले.

ही घटना वीस दिवसांपूर्वी घडली असावी असा अंदाज पोलीसांकडून व्यक्त करण्यात येत असून पाटात आढळून आलेल्या मृतदेहाच्या तुकडयांची नेवासा फाटा येथील ग्रामीण रूग्णालयात करण्यात आली. मृतदेहाचे पाय, मुंडके, मंडी असे शरीराचे अवयव आढळून आल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.


चोंभूत (ता. पारनेर )येथील मोफत नेत्र तपासणी शिबिराचा शुभारंभ करताना सरपंच कांचन म्हस्के, दत्तात्रय कोल्हे, भूषण शेळके, रामदास पारखे, नितीन भालेराव व आदी ग्रामस्थ. (छाया : स्वप्नील भालेराव )

# चोंभूत येथील नेत्र तपासणी शिबिरात १०० रुग्णांची तपासणी

**चोंभूत : प्रतिनिधी**

चोंभूत (ता. पारनेर ) येथे दि.१८ रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. सदर शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला असून १०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरातील १२ रुग्णांची अल्प दरात नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. निल क्रांती तरुण मित्र मंडळ व माता रमाई महिला मंडळ, शशांक खोसे व मोहन ठुसे नेत्र रुग्णालय नारायणगाव यांच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कांचन दत्तात्रय म्हस्के (सरपंच ), दत्तात्रय कोल्हे (चेअरमन ), भूषण शेळके, रामदास पारखे, संतोष खाडे, शिवाजी कोल्हे, किसन गुंजाळ, नितीन भालेराव अशोक म्हस्के, जनाजी म्हस्के, देवराम जमदाडे,बाळासाहेब सोनवणे, किरण दरेकर, समस्त ग्रामस्थ व शिबिरार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय भालेराव यांनी केले तर आभार डॉ. प्रवीण भालेराव यांनी मानले.

# सुपा परिसरात पेरणीपूर्व मशागतींना वेग

## बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत

**सुपा : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ होत असल्याने यांत्रिक शेती तोट्यात जात आहे. पेट्रोलने शंभरी पार केली असून ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलच्या किमतीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. नांगरट, पाळी व पेरणी साठी लागणाऱ्या ट्रॅक्टरला नऊशे ते एक हजार रुपये मोजावे लागत आहेत.

सुपा परिसरात तीन ते चार दिवसांपूर्वी झालेल्या हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे शेतकऱ्यांकडून पेरणीपूर्व मशागतींना वेग आला आहे. मान्सूनपूर्व पाऊसाची शेतकरी चातकाप्रमाणे वाट पहात असून तो खरीप हंगामासाठी पूरक असल्याने शेतकरी मशागत करताना व्यस्त दिसत आहेत. सुपासह हंगा, मुंगशी, लोणी हवेली, वाघुंडे, जातेगाव, म्हसणे सुलतान, पळवे, आपधूप,


सुपा. ता पारनेर परिसरात खरीपाच्या पेरणीपूर्व मशागतींना वेग आला आहे. (छाया– शरद रसाळ, सुपा)

बाबुर्डी, भोयरे गांगर्डा, कडूस, पाडळी रांजणगाव, रांजणगाव मशीद, पिंपरी गवळी, वाळवणे, रायतळे, आस्तगाव, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण या भागात मान्सूनपूर्व मशागतींना वेग आला असून पावसाने वेळेवर हजेरी लावल्यास शेतकऱ्यांकडून खरीपाची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र पेरणीपूर्व मशागतीला वेग आला आहे. बी बियाणे, खते, औषधे खरेदी करण्यासाठी शेतकरी आर्थिक तरतूद करू लागला आहे.

गतवर्षी मान्सून पूर्व पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम वाया गेला. त्यातच दुधाला देखील पाण्याच्या बाटलीचा भाव मिळत आहे. कांद्याची निर्यात उठवूनही बाजारभाव मिळत नाही या सर्वामुळेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. मात्र तरीही यासर्व समस्यांना तोंड देत ग्रामीण भागातील शेतकरी पुन्हा एकदा नव्याने उभं राहण्यासाठी आता खरीप हंगामातील पेरणीच्या लगबगीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यात खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून मूग या पिकाकडे पाहीले जाते. यासह वाटाणा, बाजरी, उडीद, तूर, ही कडधान्यही बळीराजा या हंगामात घेतो. त्याचबरोबर लाल कांदा, फुलशेती व जनावरांसाठी लागणारी मका,कडवळ आदींच्या पेरणीसाठी बळीराजा शेतात मशागत करताना दिसत आहे.

# अय्यप्पा मंदिराचा २२ ते २४ मे प्रतिस्थापना महोत्सव

**नगर : प्रतिनिधी**

सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा ३० वा प्रतीस्थापना महोत्सव(वर्धापनदिन)बुधवार दि २२ ते २४ मे पर्यंत तीन दिवस साजरा होत असून त्यानिम्मित विविध कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार्याच्या उपस्थिती करण्यात आले आहे अशी माहिती अध्यक्ष के.के. शेट्टी यांनी दिली

सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी,गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास २९ वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिनानिमीत पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे यामध्ये महागणपतीहोम,अभिषेक,प्रसन्ना पूजा व लक्षाचर्न होणार आहे तर कलशपूजा अय्यप्पा स्वामी,गणपती व सरस्वती देवीची होणार आहे बुधवार दि २२ रोजी संध्याकाळी गणपती पूजा ,आचार्य वरणम्, प्रसाद शुद्धी क्रिया,अस्त्र कलश



पूजा,रक्षोघ्न होमम,वास्तु होमम,कलशम, वास्तुबाली, अथजा पूजा विधी होणार आहे गुरुवार २३ मे रोजी सकाळी महागणपती होमम् ,महा मृतुंजय होमम्,चथु शुधी, धारा, पंचकम, अनुज्य कलशम्, उंच पूजा विधी तर संध्याकाळी द्रव्य कलश पूजा ,आदिवासी होमम् अथजा पूजा विधी होणार आहे शुक्रवार २४ रोजी सकाळचे विधी गणपती होमम,उषापूजा,अष्टबंधम चारथाळ,कलशाभिषेकम् ,वाहन प्रतिष्ठा आणि नमस्कार मंडप समर्पण,कुंभ भिषेक,उंच पूजा तर संध्याकाळी ,भगवती सेवा,पुष्पाभिषेकम्, अथझा पूजा होणार आहे संध्या ५ वा सावेडीतून भव्य शोभायात्रा(तालापोळ्ली)काढण्यात येणार आहे महिला मोती कलरच्या साड्या परिधान करून हातात फुलांनी सजवलेली ताट व त्यामध्ये अर्धा नारळ दिवा प्रज्वलित करतात ही तालापोळ्ली पाहण्यासाठी नागरिक गर्दी करतात तर मंदीर परिसर फुलांनी व दिव्यांनी सजविण्यात येते.यामध्ये वाद्यसंघम सादर करणार आहे. संध्या ७ वा दीपआराधना,भगवती सेवा,पुष्पभिषेक,आथंजा पूजा करण्यात येणार असून. नंतर भाविकांना महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहावे तसेच.श्री आयप्पा सेवा समितीच्या कलश पुजेस ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी व अन्नदानासाठी मंदिरात किवा ९८६०४१७६५३किंवा ९८६०५४२०६८ या मोबाईल वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.


# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची वार्षिक सभा रविवारी

## विश्वस्त मंडळाची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न

**निघोज : प्रतिनिधी**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि.१९ रोजी सकाळी ९ वाजता जवळा रोडवरील पुष्कर लॉन्स येथे होत असून २०२४-२५ ते २९-३० विश्वस्त मंडळ निवड करणे हा विषय प्रामुख्याने असल्याने विश्वस्त मंडळाची निवड बिनविरोध करण्यासाठी सत्ताधारी गट प्रयत्नशील आहे.

गेली २८ वर्षांपूर्वी या ट्रस्टची स्थापना झाली असून ११८१ सभासद संख्या आहे. गेली अनेक वर्षांपासून या ट्रस्टची सभासद संख्या गेली नऊ वर्षांपासून सातत्याने वाढत आहे मात्र गेली आठ महिन्यांत सत्ताधारी विश्वस्त मंडळाने साडेतीनशे सभासद संख्या वाढवून निवडणुकीत विरोधी गटाला स्थान मिळू नये यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत सभासद संख्या वाढवली आहे. गावातील सर्वच सत्तास्थाने आपल्याकडे पाहिजे यासाठी प्रयत्न आहेत, सध्या ग्रामपंचायत वराळ ( विखे ) गटाकडे आहे तसेच सोसायटी माजी आमदार नीलेश लंके गटाकडे आहे. काही पतसंस्था सध्या मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत असल्याने मात्र त्या ठिकाणी मात्र संचालक होण्यास कुणीही धजावत नाहीत शक्यतो या संस्था बिनविरोध होत असतात.



मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान असून दसरा नवरात्र उत्सव तसेच चैत्र पौर्णिमा यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात होत असतो दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे व्यवहार या ट्रस्ट माध्यमातून होत असल्याने या ठिकाणी विश्वस्त होण्यासाठी या वर्षी युवकांसहीत ज्येष्ठ मंडळी प्रयत्नशील आहेत. या संस्थेतील विश्वस्ताला समाजात मोठा मान असल्याने विश्वस्त होण्यासाठी स्पर्धा वाढणार आहे. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी हात उंचावून ही पद्धत तसेच गुप्त मतदान पद्धती हे पर्याय असल्याने सत्ताधारी व विरोधी गट कशी जुळवाजुळव करतात यावर सर्व काही अवलंबून आहे. सत्ताधारी गटाची सभासद संख्या आठशे पेक्षा जास्त आहे. विरोधी गटाची सभासद संख्या तीनशे पर्यंत आहे मात्र बहुतांश जुन्या जाणत्या विश्वस्त मंडळाचा पत्ता कट होण्याची शक्यता असून गटातटात कोण कुणाच्या बाजूला जातो यावर निवडणूक भवीतव्य अवलंबून आहे. अल्पसंख्याक समाजाचे ज्येष्ठ नेते व मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर तसेच तब्बल पन्नास पेक्षा जास्त सभासदांनी निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.


# कुकडीचे पाणी २० तारखेपर्यंत मिळावे

## दि.२५ रोजी पाणी सोडण्याची जलसंपदा विभागाची भूमिका

**निघोज : प्रतिनिधी**

कुकडी डावा कालवा परिसरातील गावांना सध्या मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने लवकरात लवकर कुकडी डावा कालव्याला पाणी सोडण्याची मागणी जनतेतून होत असली तरी दि.२५ मे किंवा त्यानंतर पाणी सोडण्याची तयारी नारायणगाव येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली आहे सध्या कुकडी प्रकल्प अंतर्गत धरणांमध्ये पाण्याचा साठा कमी असल्याने व आगामी पावसाची शक्यता गृहीत धरुन हा निर्णय घ्यावा लागत असल्याने कुकडी डावा कालव्याचे आवर्तन दि.२५ मे किंवा त्यांनंतर म्हणजे साधारण दि.२८ मे पर्यंत सोडण्याचा निर्णय कुकडी डावा कालवा नारायणगाव विभागाचे अधिकारी यांनी घेतला आहे.

कुकडी प्रकल्प अंतर्गत धरणांमध्ये पाण्याचा साठा कमी असला तरी पुणे जिल्ह्यातील या धरणांचा फायदा असलेल्या जलसिंचन योजनांना भरपूर प्रमाणात



पाणी सोडण्यात आले आहे. साधारण हे पाणी सोडताना पुण्याचे पुढारी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर दडपण आणीत पाणी सोडण्याची मागणी करतात. धरणे आमच्या जिल्ह्यातील असल्याने याचा फायदा सर्वाधिक आम्हाला मिळाला पाहिजे ही त्यांची सातत्याने मागणी असते. याबाबत मात्र अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत जामखेड या तालुक्यांवर सातत्याने अन्याय होत असतो.सध्या या तालुक्यांतील बहुतांश गावात पाण्याची तिव्र टंचाई असल्याने दि. २० पर्यंत पाणी सोडण्याची मागणी जनतेतून होत आहे.

या सर्व तालुक्यात गोधन मोठ्या प्रमाणात आहे. शेतीमालाला योग्य भाव नसल्याने शेतकरी दूध उत्पादन व्यवसाय मोठ्या प्रमाणात करीत असतात सध्या शेतीमाल व दूध उत्पादन या दोन्हीना योग्य भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. खताचे व गोधनाला लागत असलेल्या खाद्याचे भाव सातत्याने वाढत आहे. आणी हिरवा चारा घेण्यासाठी पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असल्याने शेतकरी व दूध उत्पादक दुहेरी संकटात सापडला आहे . यासाठी दि. २५ किंवा त्यानंतर कुकडी डावा कालव्याला पाणी सोडण्यापेक्षा दि. २० पर्यंत पाणी सोडण्याची मागणी जनतेतून होत आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com